N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** महात्मा फुले चौक **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0605 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/08/2021 01:45 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 26/08/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/08/2021

**Time From (वेळेपासून):** 11:48 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/08/2021 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/08/2021 01:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कल्याण तहसिलदार कार्यालय,कल्याण पश्चिम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.मिनकेतन गोविंद पात्रा

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** गोविंद पात्रा

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एलजी2 विश्वजीत इवेलिंग,नवरे,नगर, अंबरनाथ पूर्व, जि ठाणे,7558437940,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एलजी2 विश्वजीत इवेलिंग,नवरे,नगर, अंबरनाथ पूर्व, जि ठाणे,7558437940,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-7558437940

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दीपक मारूतीराव आकडे | | | 1. केसर हार्मोणी, सेक्टर नं6,,बिल्डींग नं6, फ्लट नं401, ,खारघर, तापनवेल, जिरायगड,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मनोहर उर्फ बाबु दत्तात्रय हरड | | | 1. बिल्डिंग न 504, अंबिका पलेस, सोसायटी, सावरकर नगर, टिटवाळा ,ता कल्याण,कल्याण तालुका,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,20,000/ रुपये लाचेची रक्कम | 120,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 120,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी श्री.मिनकेतन गोविंद पात्रा,वय-50 वर्ष,व्यवसाय नोकरी,राह. एल.जी.2 विश्वजीत इवेलिंग,नवरेनगर, अंबरनाथ पूर्व, जि. ठाणे मोबाईल 7558437940/8788437940, फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटूंबियासह राहण्यास असून मी श्री. गुलाबराव करंजुले यांचे जी.बी.के. ग्रुप या बांधकाम कंपनीत मनेजर म्हणून काम करीत आहे.तक्रारदार यांच्या जी.बी.के. ग्रुप अंतर्गत असलेल्या अभिजीत कन्स्ट्रक्शन या बांधकाम कंपनीने मौजे वरप ता. कल्याण येथे घेतलेल्या जमिनीबाबतचे हरकतीवरील सुनावणीचे निकालपत्र देण्यासाठी कल्याण तहसिलदार श्री. दिपक आकडे यांनी त्यांचा शिपाई मनोहर उर्फ बाबु हरड यांचे मार्फतीने माझेकडे एक लाख रुपयेची लाचेची मागणी केली.तसेच मनोहर उर्फ बाबु हरड यांनी स्वतःसाठी व स्टाफसाठी वीस हजार रुपयांची लाचेची मागणी केली.परंतु मला तहसिलदार दीपक आकडे व त्यांचा शिपाई मनोहर उर्फ बाबु हरड यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांचेकडे जावून तक्रार करण्याचा निर्णय घेतला.दि. 25/08/2021 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,ठाणे कार्यालय येथे जावून लाचलुचपत विभाग ठाणेचे पोलीस निरीक्षक संतोष शेवाळे यांची भेट घेतली.त्यांना मी लोकसेवक कल्याण तहसिलदार श्री.दिपक आकडे व त्यांचा शिपाई मनोहर उर्फ बाबु हरड हे माझ्याकडे लाचेची मागणी करत असलेबाबत सांगितले. त्यावेळी पोलीस निरीक्षक संतोष शेवाळे यांनी मला माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता माझे हस्ताक्षर चांगले नसल्याने माझी तक्रार पोनि शेवाळे यांनी दिलेल्या सुचनेनुसार पोशि जाधव यांनी मी सांगितलेप्रमाणे लपटापवर टंकलिखित करुन तिची प्रिंट काढून मी सदरची तक्रार वाचून त्यावर सही केली. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोनि शेवाळे यांनी दोन शासकिय पंच मागविले. त्याप्रमाणे दि.25/08/2021 रोजी दोन शासकीय पंच आल्यानंतर पोनि शेवाळे यांनी मी दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. त्याप्रमाणे दोन्ही पंचांनी सदरची तक्रार वाचून माझे तक्रारीवर सहया केल्या आहेत.मी दिलेल्या तक्रारीचा आशय खालील प्रमाणे.मी श्री. गुलाबराव करंजुले यांचे जी.बी.के.गु्रप या बांधकाम कंपनीत मनेजर म्हणून काम करीत आहे.आमचे जी.बी.के. गु्रप अंतर्गत असलेल्या अभिजीत कन्स्ट्रक्शन कंपनीने मौजे वरप ता.कल्याण जि.ठाणे येथील सर्वे नं 65/2 हि जमीन खरेदी केली आहे.सदर

जमिनीचे सातबारा वर आमचे कंपनीचे नाव चढविण्यासाठी फेरफार नोंद झाली आहे. त्यांचे हरकतीकरीता मौजे वरप येथील तलाठीने ना हरकतीकरिता नोटीस काढली आहे.त्यावेळी सदर जमिनीचे शेजारी असलेल्या जमिन मालकाने हरकत घेतली होती. म्हणून तो दावा तहसिलदार कल्याण यांचेकडे प्रलंबित होता.परंतु त्यानंतर सदर जमिन मालकाने तहसिलदार यांचे समक्ष त्याची हरकत मागे घेतली होती.सदर दावा निकाली काढण्याकरीता तहसिलदार कल्याण,दिपक आकडे यांनी त्यांचा कार्यालयीन शिपाई हरड यांचे मार्फतीने माझेकडे 1,00,000/-रुपयेची लाचेची मागणी केली. तसेच शिपाई हरड यांनी स्वतःसाठी व स्टाफसाठी 20,000/- रुपयांची मागणी केली परंतु मला त्यांना लाच दयायची इच्छा नसल्याने माझी लोकसेवक कल्याण तहसिलदार श्री. दीपक आकडे व त्यांचा शिपाई मनोहर उर्फ बाबु हरड यांचेविरुध्द कारवाई होणेबाबत माझी कायदेशीर तक्रार आहे. अशा मजकुराची तक्रार दिली. त्याअनुषंगाने पोनि शेवाळे, दोन्ही पंच व माझ्यात विचारविनिमय होवून दि. 26/08/2021 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे ठरवले.दि.26/08/2021 रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मला लोकसेवक यांचे कार्यालयात डिजीटल व्हाईस रेकार्डरसह पंच साक्षीदार यांचेसमवेत पाठवून पडताळणी कारवाई केली असता, करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत मी लोकसेवक नं.2बाबु हरड यांना भेटलो असता माझे प्रलंबित असलेल्या कामाबाबत चर्चा करुन मनोहर (बाबु) हरड यांनी तहसिलदार श्री.आकडे साहेबांना विचारुन एक लाख रुपये सांगितले असून काही कमी करता येत असेल तर करा असे मी बोलल्यानंतर लोकसेवक बाबु हरड यांनी याच्यात काय कमी करणार,त्याचे पेक्षा काय कमी करणार,असे बोलुन स्वतःसाठी व स्टाफकरीता विसेक तरी आणा ना....खाली आहेत बसलेले त्यांना द्यायला अशी स्पष्टपणे लाचेची मागणी केली त्यानंतर मी लोकसेवक नं.1 तहसिलदार श्री.दीपक आकडे यांना भेटलो असता श्री आकडे यांनी काय तिच्या आयला,कमी केलतं ना आतातु जमा कर,मैं आज कर देता हु, अभीअसे बोलल्यानंतर मी त्यांना मैं आज ही लेके आता हूं। दे के जाता हु असे बोलल्यावर लोकसेवक श्री.आकडे यांनी ठिक है ... आज जमा करून टाका अशा स्वरूपाची लाचेची मागणी करुन ती खुणेने कार्यालयातील शिपाई लोकसेवक मनोहर (बाबु) हरड, यांचेकडे देण्यास सांगितली. तसेच लोकसेवक नं. 2 मनोहर (बाबु) हरड यांनी स्वतःसाठी व स्टाफ करिता 20,000/- रुपयांची मागणी करून ते घेवुन येण्यास सांगितल्याने सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे सापाळापुर्व कारवाईच्या नोंदी घेवुन सापळा आजमाविण्यासाठी पुन्हा तहसीदार कल्याण यांच्या कार्यालयात पंचासह गेलो मात्र तोपर्यंत लोकसेवक दिपक आकडे हे कार्यालयातून निघून गेल्याने सदरची सापळा कारवाई दिनांक 27/08/2021 रोजी करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदरबाबत सविस्तर पडताळणी-सापळापूर्व-सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला.दिनांक 27/08/2021 रोजी माझे महत्त्वाचे काम असल्याने मी मनोहर (बाबु) हरड, शिपाई यांना फोन करुन माझ्या प्रलंबित कामाबाबत विचारले असता,त्यांनी जमिनीबाबतचे हरकतीवरील सुनावणीचे निकालपत्र तयार झाले नसून तसेच तहसिलदार आकडे साहेब नसल्याने दि.30/08/2021 रोजी दुपारी येण्यास सांगितले. दिनांक 27/08/2021 रोजी मनोहर उर्फ बाबु हरड यांनी सांगितलेप्रमाणे 30/08/2021 रोजी तहसिलदार कार्यालय, कल्याण येथे बोलवले असल्याने व पोनि शेवाळे यांनी दिलेल्या सुचनेनुसार दि. 30/08/2021 रोजी कृषी बाजार समिती कल्याण येथे बोलावल्याने सापळापूर्व कारवाई कल्याण कृषी बाजार समिती येथील मोकळया जागेत करुन सदरबाबत सविस्तर सापळापूर्व पंचनामा करण्यात आला.त्यानंतर लोकसेवक यांनी मागणी केलेले लाचेची रक्कम रूपये 1,20,000/- अन्थ्रेसिन पावडर लावुन त्यांना देण्यासाठी मला व्हाईस रेकार्डर लावून पंच साक्षीदार यांचे समवेत कल्याण तहसिलदार कार्यालय, कल्याण येथे पाठवून सापळा पथक माझ्या पाठोपाठ तहसिलदार कल्याण येथे आले. मी कल्याण तहसिलदार कार्यालय, कल्याण कार्यालयात कुळ वहिवाट शाखा येथे कार्यरत असलेले मनोहर उर्फ बाबू हरड यांना भेटलो त्यावेळी मी माझ्या प्रलंबित कामाचे अनुषंगाने चर्चा केली असता लोकसेवक मनोहर उर्फ बाबु हरड यांनी मला आर्डर तयार झालेली नाही आधी तुम्ही भेटा असे बोलून लाचेची मागणी केल्यावर मी त्यांना साहेबांचे एक लाख आपले आकडे साहेबांच असे बोलून मी त्यांना तहसिलदार श्री. आकडे यांच्याकरीता 1,00,000/- रुपये व लोकसेवक मनोहर उर्फ बाबु हरड यांनी स्वतःकरीता 20,000/- रुपये असे एकूण 1,20,000/- रू. लाचेची रक्कम त्यांच्यासमोर धरली असता त्यांनी त्याच्या डाव्या हाताने पन्टच्या समोरील बाजूच्या डाव्या खिशानध्ये ठेवून दिली. त्यानंतर मी लाचेचा स्विकार झालेबाबतचा पूर्व नियोजित इशारा करताच सापळा पथकाने लोकसेवक श्री. मनोहर उर्फ बाबु हरड यांनी लाच स्विकारल्यानंतर त्यांना 12.46 वा. लाच रक्कमेसह तसेच तहसिलदार श्री. दीपक आकडे यांना 12:49 वा. ताब्यात घेतले. त्यानंतर लोकसेवक श्री. मनोहर उर्फ बाबु हरड यांच्या नेसूस पंटच्या समोरील बाजूच्या डाव्या खिशातून लाचेची रक्कम पंचांसमक्ष जप्त करण्यात आली असून त्याबाबत सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. संपूर्ण सापळा कारवाईत डिजीटल व्हाईस रेकार्डरचा वापर करुन मेमरीकार्ड मध्ये माझेत व लोकसेवक नं. 2 मनोहर उर्फ बाबू दत्तात्रय हरड यांचेत समक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.तरी लोकसेवक दीपक मारुतीराव आकडे, वय 45, पद- तहसिलदार, वर्ग - 1, तहसिल कार्यालय, कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे, रा. केसर हार्मोणी, सेक्टर नं.6, बिल्डींग नं.6, फ्लट नं.401, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड व लोकसेवक मनोहर उर्फ बाबु दत्तात्रय हरड, वय 42, पद- शिपाई, वर्ग - 4, तहसिलदार कार्यालय, कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे, राह. बिल्डिंग नं. 504, अंबिका पलेस सोसायटी, सावरकर नगर, टिटवाळा पूर्व ता. कल्याण जि. ठाणे यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी माझ्या बांधकाम कंपनीने मौजे वरप ता. कल्याण येथे घेतलेल्या जमिनीबाबतचे हरकतीवरील सुनावणीचे निकालपत्र देण्यासाठी लोकसेवक नं. 1 तहसिलदार दीपक आकडे यांनी स्वतःकरीता 1,00,000/- रू. लाचेची मागणी करुन ती कार्यालयातील शिपाई लोकसेवक मनोहर (बाबु) हरड, यांचेकडे देण्यासाठी सांगितली. तसेच लोकसेवक नं. 2 मनोहर उर्फ बाबु हरड यांनी स्वतःसाठी व स्टाफ करिता 20,000 /- रुपयांची लाचेची मागणी करुन लोकसेवक क्र. 2 हरड यांनी तहसिलदार श्री. आकडे यांच्याकरीता 1,00,000/- रुपये व स्वतःकरीता 20,000/- रुपये असे एकूण 1,20,000/- रू. लाचेची रक्कम माझेकडून स्विकारल्याने माझी दीपक मारूतीराव आकडे, तहसिलदार, कल्याण व मनोहर (बाबु) दत्तात्रय हरड, शिपाई, तहसिल कार्यालय, कल्याण यांचेविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे मराठीत लपटापवर टंकलिखित करण्यात आली असून ती मी वाचुन पाहिली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) ***or*** (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): PRADIP SHRIPATI PATIL

**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) ***or*** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SAMBHAJI TULSHIRAM JADHAV

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
महात्मा फुले चौक पोलीस ठाणे,
कल्याण (प), ठाणे शहर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**